12/30/2014

# REVIEWED INTERNATIONAL JOURNAL


## VOL III Issues VI

NOV-DEC 2014


## Electronic International Interdisciplinary Research Journal ( EIIRJ )


**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**



**ISSN : 2277-8721**

**Impact factor: 0.987**

| www.aarhat.com

# बॅकींग सेवा वापरातील ठेवी धारकांतील लिंगभेद विशेष संदर्भ बॅक ऑफ महाराष्ट्र व युनियन बॅक ऑफ इंडिया कोल्हापूर

*Research paper in Economics*

**संपदा आनंद काळे**
संशोधक विद्यार्थीनी,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठएकोल्हापूर.
**डॉ. अनघा पाठक**
अर्थशास्त्र,विभाग प्रमुख,
कमला कॉलेज, कोल्हापुर.

## प्रस्तावना

आज 21 व्या शतकात जागतिक पातळीवर वेगवेगळ्या क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून येत असल्याचे दिसत आहे. तंत्रज्ञानाची झालेली प्रगती आज आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यवहारांमध्ये दिसुन येऊ लागली आहे. शेती, उद्योग, वाहतुक दळणवळण व सेवा क्षेत्र इत्यादि क्षेत्रांची प्रगतीही प्रचंड प्रमाणात झाली आहे आणि त्याला आवश्यक असणारी महत्वपुर्ण गोष्ट म्हणजे 'पैसा' किंवा 'भांडवल' उपलब्ध करून देणाऱ्या बॅकीग क्षेत्राचेही महत्व अर्थव्यवस्थेत वाढू लागले आहे. बॅकींग क्षेत्राचे प्राथमिक कार्य आहे. ठेवी स्विकारणे व कर्जे देणे. अर्थव्यवस्थेला जसा

वित्तपुरवठा होणे, भांडवल उपलब्ध होणे गरजेचे आहे. तसेच ते भांडवल निर्माण होण्यासाठी बॅकांकडे ठेव स्वरूपात पैसा उपलब्ध होणे हे देखील महत्वाचे आहे. बॅकांकरीता जसे ठेवीधारक महत्वपुर्ण आहेत तसेच बाजारपेठेतील, समाजातील लोकांना आपली बचत ठेव सुरक्षित ठेवणारी बॅकदेखील त्यांच्या दृष्टिकोनातुन महत्वपूर्ण आहेत. बॅका वेगवेगळया प्रकारच्या ठेवी स्विकारतात जसे बचत ठेवी, मुदत ठेवी, आवर्ती ठेवी इ. आणि याच ठेवींच्या माध्यमातुन बॅका आपली पतनिर्मीती करीत असतात. परंतु बॅकांकडुन पुरविल्या जाणाऱ्या या ठेव खाते सेवेचा लाभ मात्र पुरूषांच्या तुलनेत स्त्रीया कमी घेतात असे दिसुन आले आहे.

**गृहितक : बॅकींग सेवावापरात लिंगभेद आढळतो**

**उद्दिष्ट्ये :**

बॅकींग सेवा वापरातील लिंगभेदाचा अभ्यास करणे.

बॅकींग सेवा मधील ठेव खाते वापर धारकांतील लिंगभेदचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

अभ्यासाचा विषय बॅकींग सेवा वापरातील लिंगभेद असा असुन अभ्यासाचे क्षेत्र कोल्हापुर शहरापर्यंत मर्यादित आहे. अभ्यासाचा कालावधी 2009 ते 2012 असा असुन प्राथमिक माहिती ही संशोधकाने प्रत्यक्ष बॅक ग्राहकांना भेटुन व मुलाखतीच्या माध्यमातुन गोळा केली आहे. दुय्यम माहिती विविध पुस्तके, लेख, मासिके, सरकारी प्रकाशने व बॅक प्रकाशने इ. माध्यमातुन मिळविली आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्रलक्ष्मीपुरी शाखा व युनियन बॅक ऑफ इंडिया लक्ष्मीपुरी आणि राजारामपुरी शाखा या मधील 2009 ते 2010, 2010 ते

2011, 2011 ते 2012 अशा तीन वर्षातील एकुण नविन बचत खातेधारकांचे वर्गीकरण केल्यानंतर 1283 स्त्रीया व 2446 पुरूष असल्याचे दिसुन आले. दुय्यम स्त्रोताच्या माहितीवरून बॅकींग सेवांमधील बचत खातेधारकांत लिंगभेद आढळला असल्याने संशोधकान 600 बचत खातेधारकांचे प्रमाण 1:2 या प्रमाणे 200 स्त्रीया व 400 पुरूष असे घेऊन या खातेधारकांकडुन बॅकींग सेवेचा वापर कशा पध्दतीने केला जातो याचा अभ्यास सदर शोधनिबंधामध्ये केला आहे.

**बचत खातेधारकांचे इतर बॅकांमधील बचत खाते.**

प्राथमिक माहितीच्या आधारे बचत खाते धारकांचे इतर बॅकांमधील बचत खातेनुसार लिंगभेद वर्गीकरण पुढील कोष्टक क.2.1 मध्ये केले आहे.

**कोष्टक क.2.1 बचत खाते धारकांचे इतर बॅकांमधील बचत खाते नुसार लिंगभेद वर्गीकरण.**

| अ.क्र. | बॅक | स्त्रीया | प्रतिशत हिस्सा | पुरूष | प्रतिशत हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीयकृत | 108 | 54 | 211 | 52.75 |
| 2 | खासगी | 33 | 16.5 | 87 | 21.75 |
| 3 | सहकारी | 59 | 29.5 | 102 | 25.05 |
| 4 | एकुण | 200 | 100 | 400 | 100 |

**स्त्रोत** : प्राथमिक सर्वेक्षण 2009–2012 च्या आधारे संशोधकाने केलेले मोजमाप

वरील कोष्टक क.2.1 मध्ये निवडलेल्या 200 स्त्रीया बचत खातेधारक व 400 पुरूष बचतखातेधारकांची बॅक ऑफ महाराष्ट्र व युनियन बॅक ऑफ इंडीया या व्यतिरिक्त इतर बॅकांमध्ये असणारे खाते याची माहिती दर्शविली आहे.

स्त्रीया व पुरूष बचतखातेधारकांपैकी स्त्रीया बचत खातेधारक व पुरूष बचत खाते धारकांचे बॅंक ऑफ महाराष्ट्र व युनियन बॅंक ऑफ इंडीया व्यतिरिक्त इतर बॅंकांमधील राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये बचत खाते असण्याचे प्रमाण हे अधिक दिसुन येते जे (स्त्रीया 54% व पुरूष 52.75%) खाजगी बॅंकांपेक्षा सहकारी बॅंकांमध्ये या बचत खातेधारकांनी खाते उघडले आहे. सहकारी बॅंकांमध्ये खाते असण्याचे प्रमाण हे 29. 5% स्त्रीया व 25.5% पुरूष असे दिसुन येते, तर खाजगी बॅंकांमधील हे प्रमाण 16. 5% स्त्रीया व 21.75% पुरूष असे आढळते.

यावरून असे दिसुन येते की आजही राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बॅंकांवरील लोकांची विश्वसनीयता ही अधिक आहे. खाजगी बॅंकाकडुनही अशा सेवा पुरविल्या जात असल्या तरी राष्ट्रीयीकृत बॅंकांमधेच बचत खाते असणाऱ्यांचे प्रमाण समाजामध्ये अधिक दिसुन आले किंवा शासनाच्या सर्व योजनांकरीता एल.आय.सी., पगार, पेन्शन, बिले भरणे, आधारकार्ड, गॅस कमिशन इ. सर्व गोष्टींकरीता सरकारने सुचविलेल्याच राष्ट्रीयकृत बॅंकांचा लोकांना वापर करावा लागत असल्याने राष्ट्रीयकृत बॅंकींग सेवांचा लाभ तुलनेने अधिक घेतला जात असल्याचे दिसुन येते.

**बॅंकेतील बचत खातेधारकांच्या नावानुसार वर्गीकरण.**

प्राथमिक माहितीच्या आधारे बचत खातेधारकांच्या नावानुसार वर्गीकरण पुढील कोष्टक क्र. 2.2 मध्ये दर्शविले आहे.

**कोष्टक क्र.2.2 बॅंकेतील बचत खातेधारकांच्या नावानुसार वर्गीकरण.**

| अ.क्र. | खातेदार | स्त्रीया | प्रतिशत हिस्सा | पुरूष | प्रतिशत हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | स्वतः | 46 | 23 | 159 | 39.75 |
| 2 | पती | 62 | 31 | — | — |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | पत्नी | — | — | 108 | 27 |
| 4 | मुले | 53 | 26.5 | 72 | 18 |
| 5 | संयुक्त | 39 | 19.5 | 61 | 15.25 |
| 6 | एकुण | 200 | 100 | 400 | 100 |

स्त्रोत : प्राथमिक सर्वेक्षण 2009–2012 च्या आधारे संशोधकाने केलेले मोजमाप.

बचत खातेधारकांपैकी बॅकेत खाते कोणाकोणाच्या नावे आहेत याची माहिती वरील कोष्टक क्र.2.2 मध्ये दर्शविली आहे. स्त्रीया व पुरूष बचतखातेधारकांपैकी स्वतःच्या, पतीच्या किंवा पत्नीच्या, मुलांच्या किंवा संयुक्त असे नेमके कोणाच्या नावे बॅकेत खाते आहे. स्वतः व्यतिरिक्त अजुन कुटुंबातील इतर कोणाकोणाच्या नावे बॅकेत खाते आहे किंवा बॅकेच्या बचत खाते सेवेचा वापर कुटुंबातील आणि आणि कोणकोणत्या सदस्यांकडुन केला जोतो इ. माहिती प्रस्तुत कोष्टक क्र.2.2 मध्ये दर्शविली आहे.

स्वतःच्या नावे व्यक्तिगत खाते असणाऱ्या स्त्रीया बचत खातेधारकांचे प्रमाण हे 23% तर पुरूष बचत खाते धारकांचे प्रमाण 39.75% इतके आहे. स्वतः आणि पतीच्या नावे खाते असणाऱ्या स्त्रीया बचत खातेधारकांचे प्रमाण 31% असुन मुलांच्या नावे खाते असण्याचे प्रमाण हे 26.5% तर संयुक्तपणे खाते असणाऱ्या स्त्रीया बचत खाते धारकांचे हे प्रमाण 19.5% इतके आहे. पुरूष बचत खातेधारकांपैकी पत्नी व स्वतःच्या नावे खाते असणाऱ्या पुरूष खातेधारकांचे प्रमाण 27%, स्वतः व मुले असे खाते असण्याचे प्रमाण 18% व संयुक्तपणे खाते असण्याचे प्रमाण हे 15.25% इतके दिसुन येते.

म्हणजेच वरील स्त्रीया व पुरूष बचत खातेधारकांची तुलना केल्यास स्त्रीयांची वैयक्तीक खाते असण्याचे प्रमाण हे पुरूषांच्या तुलनेने कमी दिसते. याउलट

ISSN : 2277-8721
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ )
Bi-Monthly Reviewed Journal Vol-III Issues VI Nov-Dec 2014

पतीबरोबर व पत्नीबरोबर खाते असे दोन्ही मधील तुलनेने स्त्रीया बचत खातेधारकांचे प्रमाण अधिक दिसते.

### ठेव खात्याच्या प्रकारानुसार लिंगभेद वर्गीकरण

प्राथमिक माहितीच्या आधारे बचतखातेधारकांच्य ठेवखात्याच्या प्रकारानुसार लिंगभेद वर्गीकरण पुढील कोष्टक क्र.3.1 मध्ये दर्शविले आहे.

कोष्टक क्र.3.1 ठेव खात्याच्या प्रकारानुसार खाते धारकांचे लिंगभेद वर्गीकरण

| अ.क्र. | खाते प्रकार | स्त्रीया | प्रतिशत हिस्सा | पुरूष | प्रतिशत हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बचत खाते | 79 | 39.5 | 175 | 43.75 |
| 2 | चालु खाते | 30 | 15 | 90 | 22.5 |
| 3 | आवर्ती खाते | 42 | 21 | 62 | 15.5 |
| 4 | मुदत खाते | 49 | 24.5 | 73 | 18.25 |
| 5 | एकुण | 200 | 100 | 400 | 100 |

स्त्रोत : प्राथमिक सर्वेक्षण 2009–2012 च्या आधारे संशोधकाने केलेले मोजमाप

वरील कोष्टक क्र.3.1 मध्ये बचत खातेधारकांकडुन बॅकेच्या ठेव खाते सेवेपैकी कोणत्या प्रकारच्या खात्याचा वापर केला जातो याची आकडेवारी दर्शविली आहे. स्त्रीया बचत खातेधारकांचा विचार केल्यास बॅकेच्या ठेव खाते सेवेपैकी बचत खाते 39.5% व मुदत खाते 24.5% या खात्यांचाच जास्तीत जास्त वापर स्त्रियांच्या कडुन केला जातो. कारण बचतीची सवय व भविष्यातील आधार म्हणुन काही रक्कम शिल्लक ठेवण्याकडे स्त्रियांचा कल अधिक दिसुन येतो. मुलांची लग्नं, शिक्षण,

ISSN : 2277-8721
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ )
Bi-Monthly Reviewed Journal Vol-III Issues VI Nov-Dec 2014

आजारपण इ. काही गोष्टींसाठीच्या भविष्यातील पुर्तता म्हणुन स्त्रीयांच्या कुडुन रिकरींग खाते, मुदत खाते व बचत खाते यांचा वापर जास्त केला जातो. परंतु चालु खात्याचा वापर अगदी कमी म्हणजे केवळ 15% एवढाच केला जातो. कारण स्त्रियांचे दैनंदिन आर्थिक व्यवहार कमी असतात.

याउलट पुरूष बचत खातेधारकांकडुन मात्र बचत खाते 43.75% व चालू खाते 22.5% इतका वापर या दोन खात्याचा केला जातो. परंतु रिकरिंग खाते किंवा मुदत खाते वापरण्याचे पुरूष बचत खाते धारकांचे प्रमाण मात्र 15.5% एवढा केला जातो व मुदत खातेधारकांचे प्रमाण 18.25% इतके दिसुन येते याचे कारण पुरूषांकडुन दैनंदिन अर्थिक व्यवहार पुर्ण करण्यासाठी बचत खाते व चालु खात्याचा अधिक वापर केला जातो.

**बॅक ऑफ महाराष्ट्र लक्ष्मीपुरी शाखा व युनियन बॅक ऑफ इंडिया लक्ष्मीपुरी आणि राजारामपुरी शाखा यामधील चालु खातेधारकांचे लिंगभेद वर्गीकरण**

खालील कोष्टक क्र.3.2 मध्ये बॅक ऑफ महाराष्ट्र व युनियन बॅक ऑफ इंडिया कडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे चालु खाते धारकांमधील लिंगभेद वर्गीकरण केले आहे.

**कोष्टक क्र.3.2 चालु खातेधारकांमधील लिंगभेद वर्गीकरण**

| अ.क्र. | वर्ष | बॅक ऑफ महाराष्ट्र | | | युनियन बॅक ऑफ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्रिया | पुरूष | एकुण | स्त्रिया | पुरूष | एकुण |
| 1 | 2009–2012 | 20 | 67 | 87 | 15 | 54 | 69 |
| | | 22.90 | 77.01 | 100 | 21.73 | 78.26 | 100 |

स्त्रोत : दुय्यम स्त्रोताच्या आधारावर संशोधकाने केलेले मोजमाप

वरील कोष्टक क.3.2 मध्ये असे दिसुन येते की, बॅंक ऑफ महाराष्ट्र लक्ष्मीपुरी शाखा व युनियन बॅंक ऑफ इंडिया लक्ष्मीपुरी आणि राजारामपुरी शाखा यामध्ये चाालु खाते धारकांत लिंगभेद आढळतो. 2009–2012 मधील एकुण चालु खाते धारकांपैकी बॅंक ऑफ महाराष्ट्र मधील स्त्रीया चालु खातेधारकांचे प्रमाण 22.90% इतके आहे. तर पुरूष चालु खाते धारकांचे प्रमाण 77.01% इतके आहे. तसेच युनियन बॅंकमधील स्त्रीचा चालु खातेधारकांचे प्रमाण हे 21.73% इतके आणि पुरूष चालु खातेधारकांचे प्रमाण हे 78.26% इतके आहे.

यावरून असे लक्षात येते की, रिकरींग खाते म्हणजे किरकोळ रक्कम थोडी थोडी जमा करणे किंवा मोठी रक्कम मुदत ठेवीवर ठेवणे याचे प्रमाण पुरूषांमध्ये कमी दिसते किंवा असे म्हणता येईल स्त्रीया बचत खाते धारक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन मुदत खात्याचा वापर पुरूषांपेक्षा अधिक करतात. परंतु चालु खात्याचा वापर मात्र स्त्रीया पुरूषांच्या तुलनेत कमी करतात.

**निष्कर्ष** :

1. बॅंकेच्या बचत खाते सेवा वापर धारकांमध्ये लिंगभेद आढळुन आला.
2. आजही राष्ट्रीयीकृत व सहकारी बॅंकांवरील लोकांची विश्वसनीयता ही अधिक आहे. खाजगी बॅंकांकडुनही अशा सेवा पुरवल्या जात असल्या तरी राष्ट्रीयकृत बॅंकांमध्येच बचत खाते असणाऱ्यांचे प्रमाण समाजामध्ये अधिक दिसुन आले.
3. स्त्रीया व पुरूष बचत खातेधारकांची तुलना केल्यास स्त्रीयांची वैयक्तीक खाते असण्याचे प्रमाण हे पुरूषांच्या तुलनेने कमी दिसते. (23% स्त्रीया व 39.75% पुरूष)

4. स्त्रीया बचत खातेधारकांचा विचार केल्यास बॅकेच्या ठेवखाते सेवेपैकी बचत खाते व मुदत खाते या खात्यांचाच जास्तीत जास्त वापर स्त्रीयांकडुन केला जातो.

5. पुरूष बचत खातेधारकांकडुन मात्र बचत खाते व चालु खाते सेवेचा वापर अधिक केला जातो.

5. शिफारशी :

बॅकींग सेवांमधील लिंगभेद कमी करण्यासाठी व स्त्रियांची अर्थिक समाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1. भारतीय समाजातील पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता कमी झाल्यास स्त्रियांना खऱ्या अर्थाने समानतेची वागणुक मिळेल.
2. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या अधिकाराचा वापर स्त्रियांनी स्वतःसाठी स्वतः करून घेणे गरजेचे आहे.
3. स्त्रियांनी बॅकींग सेवांमधील केवळ बचत खाते, मुदत खाते याचाच वापर न करता चालु खाते सेवेचाही लाभ घेतला पाहिजे.
4. जास्तीत जास्त स्त्रियांनी बॅकेत स्वतःच्या नावे खाते उघडले पाहिजे.
5. बॅकांनी देखील स्त्रीयांकरीता काही विशेष सवलती दिल्यास स्त्रिया खातेधारकांचे प्रमाण वाढु शकेल.

**संदर्भ** :

Chavan Pallavi – EPW (2008) “Gender inequality in Banking services in India.”

Dr. P.K. Deshamukh - Ed (2003) Banking and finance system – Phadke Prakashan – Kolhapur.

ISSN : 2277-8721
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ )
Bi-Monthly Reviewed Journal Vol-III Issues VI Nov-Dec 2014

Economic survey of Maharashtra. 2009 - 2010

इंगोले प्रतिभा (2001) :'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?'दिलीपराज प्रकाशन'– पुणे.'

नाइक शोभा (2007) : 'भारतीय संदर्भातुन स्त्रीवाद' प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह, प्रकाशन मुबई

साने गीता (1997) : 'भारतीय स्त्री जीवन' कोपार्डेकर : प्रकाशन पुणे

Copyrights @ **संपदा आनंद काळे व डॉ. अनघा पाठक** This is an open access reviewed article distributed under the creative common attribution license which permits unrestricted use, distribution and reproduction in any medium, provide the original work is cited.